Rcd.

# पुणे विद्यापीठ

## विद्यापीठ क्रीडा मंडळ

जा. क्र. विक्रीमं/६. २१/१६६८

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

दिनांक : १८ / ११ /२०१३

प्रति,

**प्रा. सुभाष देशमुख (अध्यक्ष)** — सी. डी. जैन महा. श्रीरामपूर

**प्रा. विशाल साळुंखे** — कला, वाणिज्य व विज्ञान महा. दिंडोरी

**श्री. सतिश रासकर** — एन. ए. बी. संचालित अंधशाळा,<br>अशोका टॉकीजरोड, थत्ते मैदानासमोर, ता. श्रीरामपूर,<br>जि. अहमदनगर

सस्नेह नमस्कार,

**विषय : आंतरविभागीय वजन उचलणे, पॉवर लिफ्टींग, बेस्ट फिजीक संबंधित खेळाच्या निवड समिती सदस्यांच्या नियुक्तीबाबत...**

विद्यापीठ क्रीडा मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सन २०१३-२०१४ या वर्षाकरिता आंतरविद्यापीठ स्पर्धेत पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व संघ निवडावयाचा आहे.

संबंधित कामासाठी विद्यापीठ क्रीडा मंडळाने निवड समिती नेमलेली आहे. या समितीचे सदस्य म्हणून आपली नियुक्ती करण्यात आलेली आहे, हे कळविण्यास आनंद होतो. खाली दिलेल्या स्पर्धेच्या कार्यक्रमानुसार आंतरविभागीय/निवड चाचणी स्पर्धा होणार असून त्यामधून गुणवत्तेनुसार संबंधित खेळाडूंचा खेळ पाहून पोझिशनप्रमाणे (स्थाननिहाय) विद्यापीठाचा संघ निवडावयाचा आहे. संबंधित विद्यापीठाचा संघ निवडताना खालील गोष्टी कृपया विचारात घ्याव्यात :

(१) आपण निवडीची शिफारस केलेल्या खेळाडूंची नावे कृपया जाहीर करू नयेत. यासंबंधी गुप्तता ठेवावी.

(२) आपण निवडीची शिफारस केलेल्या संघांची यादी बंद पाकिटात विद्यापीठ क्रीडा मंडळाचा प्रतिनिधी नसल्यास आपणांपैकी (निवड समिती सदस्यांपैकी) एकाने मा. उपकुलगुरू, पुणे विद्यापीठ, पुणे ७ यांच्याजवळ प्रत्यक्ष आणून द्यावी. तसेच, विद्यापीठ क्रीडा मंडळातील प्रतिनिधी स्पर्धेच्या वेळी हजर असतानाही बंद पाकिटावर 'मा. उपकुलगुरू, पुणे विद्यापीठ, पुणे ७' हाच पत्ता असावा.

(३) स्पर्धेच्या वेळी त्या ठिकाणी होणारे सर्व सामने प्रत्यक्ष पाहून संघांची निवड करावी.

(४) या स्पर्धेत आपला नातेवाईक खेळाडू असल्यास कृपया आपण ही जबाबदारी स्वीकारू नये (भाऊ, बहीण, चुलत भाऊ, भावाची व बहिणीची मुले, तसेच पत्नीकडील नातेवाईक व इतर प्रकारचे जवळचे नातेवाईक).

(५) स्पर्धेच्या वेळी आपण कृपया निवड समितीच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही जबाबदारी स्वीकारू नये (स्पर्धेच्या वेळी पंच म्हणून उभे राहणे, ओळखीच्या खेळाडूंना अथवा संघास मार्गदर्शन करणे, तसेच आलेल्या संघव्यवस्थापकांशी जवळीक साधणे, स्पर्धेच्या वेळी खेळाडूंच्या नातेवाईकांशी अगर खेळाडूंच्या ओळखी असलेल्यांची जवळीक करणे, इत्यादी). क्रीडा मंडळ प्रतिनिधींनी विनंती केल्यास व नियोजित पंचाबद्दल शंका उपस्थित झाल्यास पंच म्हणून कार्य केल्यास हरकत नाही.

(६) **आपण निवड समिती सदस्य आहात याबाबतची आवश्यक ती गोपनीयता कृपया पाळावी.** तसेच, आपण निवड समितीचे सदस्यत्व स्वीकारू इच्छिता किंवा कसे हे खालील दूरध्वनीवर कळवावे ही विनंती : (२५६०११४३, २५६०११४२). तसेच तारेने अथवा पत्राने या कार्यालयाशी त्वरित संपर्क साधावा.

Chandraroop Dakale Jain College of Commerce Shrirampur

(७) स्पर्धेचा कार्यक्रम खालीलप्रमाणे सविस्तरपणे देत आहोत :

टीप : (१) कृपया, निवड समिती सदस्यांनी विद्यापीठाने दिलेल्या वेळेनुसार स्पर्धास्थळी पोहोचण्याचा प्रयत्न करावा अथवा वेळेपूर्वी हजर राहावे, म्हणजे स्पर्धा नियोजित सचिवास आपली निवासव्यवस्था करणे सोयीचे होईल.

(२) निवड समिती सदस्यांच्या विद्यापीठ संघ निवडीविषयी संबंधीच्या विचारांत एकमत न झाल्यास सर्व सदस्यांना विनंती की, त्यांनी त्यांचे निवडीसंबंधीचे मत अथवा अहवाल स्वतंत्र सीलबंद पाकिटात बंद करून मा. उपकुलगुरू यांच्या नावे स्पर्धेच्या वेळी हजर असलेल्या विद्यापीठ प्रतिनिधीजवळ द्यावेत, मात्र कोणत्याही परिस्थितीत परस्पर निवडीसंबंधी कोठेही वाच्यता करू नये व एकमेकांविषयी गैरसमज पसरवू नयेत, ही विनंती.

(३) विद्यापीठ क्रीडा मंडळाकडून संघांची निवड योग्य वेळी जाहीर केली जाईल.

## आंतरविभागीय स्पर्धेचा सविस्तर कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| (१) | स्पर्धेचे नावः | वजन उचलणे, पॉवर लिफ्टींग, बेस्ट फिजीक |
| (२) | स्पर्धेचे ठिकाणः | पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे<br>बाबुजी आव्हाड महाविद्यालय (कला व वाणिज्य)<br>पाथर्डी - ४१४ १०२<br>जि. अहमदनगर |
| (३) | स्पर्धेचा कालावधीः | १४/१२/२०१३ ते १७/१२/२०१३ |
| (४) | संयोजन सचिवाचे नावः | प्रा. विजय देशमुख |

धन्यवाद, सहकार्याची अपेक्षा !

आपला,

संचालक, विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण.

प्रत माहितीसाठीः शा. शि. संचालक, प्रा. विजय देशमुख,बाबुजी आव्हाड महा. पाथर्डी

Chandraroop Dakale Jain College of Commerce Shrirampur

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur

(कृ. मागे पहा